# सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय

**नवीन मध्यवर्ती इमारत, तिसरा मजला, पुणे-४११००१**
दुरध्वनी क्रमांक : २६१२२८४६ / ४७ Email - commcoop2011@gmail.com

---

जा.क्र.सआ/इतर संस्था/स्वयंरोजगार-सुशिक्षित बेरोजगार सं./नोंदणी निकष/२३ ३७५ दिनांक:- ० /०८/२०२३

## -: परिपत्रक :-

**विषय :- बेरोजगार, स्वयंरोजगार, सुशिक्षित बेरोजगार, महिला , बहुउद्देशीय व इतर सहकारी संस्थांचे जिल्हास्तर/विभागीयस्तर व राज्यस्तर नोंदणी व कार्यक्षेत्रवाढबाबत निकष**

## प्रस्तावना :

महाराष्ट्र शासनाने बेरोजगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांच्या सहकारी संस्था स्थापन करुन त्यांना काम मिळविण्याची संधी देण्याचे धोरण अवलंबिले आहे. शासनाकडून अथवा शासन अंगिकृत उपक्रमाव्दारे जी कामे कंत्राटी पध्दतीने अथवा शासकीय यंत्रणेव्दारे राबविली जातात. त्यापैकी काही कामे या बेरोजगारांच्या सहकारी संस्थेस देऊन त्यांना वर्षभरासाठी सतत काम मिळेल व रोजगाराची संधी मिळेल अशा प्रकारे कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्यानुसार बेरोजगार, स्वयंरोजगार, सुशिक्षित बेरोजगार, महिला , बहुउद्देशीय व इतर सहकारी संस्थांचे नोंदणी बाबत निकष खालीलप्रमाणे निश्चित करण्यांत येत आहेत.

**बेरोजगार, स्वयंरोजगार, सुशिक्षित बेरोजगार, महिला , बहुउद्देशीय व इतर सहकारी संस्थांचे नोंदणी निकष : -**

अ) **बेरोजगार, स्वयंरोजगार, सुशिक्षित बेरोजगार, महिला , बहुउद्देशीय व इतर सहकारी संस्थांचे नोंदणी निकष**

## १. भाग भांडवल :

| कार्यक्षेत्र | भाग भांडवल रक्कम | | |
|---|---|---|---|
| | सर्वसाधारण | मागासवर्गीय | महिला सह. संस्था |
| ग्रामस्तर /तालुका स्तर/ प्रभाग स्तर | रु.५०,०००/- | रु.२५,०००/- | रु.१५,०००/- |
| जिल्हा पातळी | रु.२,००,०००/- | रु.१,००,०००/- | रु.५०,०००/- |
| विभागीय पातळी | रु.३,००,०००/- | रु.२,००,०००/- | रु.१,००,०००/- |
| राज्य पातळी | रु.५,००,०००/- | रु.२,५०,०००/- | रु.२,००,०००/- |

## २. सभासद संख्या :-

| कार्यक्षेत्र | सर्वसाधारण | | मागासवर्गीय | | महिला संस्था | |
|---|---|---|---|---|---|---|
| | सभासद संख्या | सभासद भाग रक्कम | सभासद संख्या | सभासद भाग रक्कम | सभासद संख्या | सभासद भाग रक्कम |
| ग्रामस्तर / तालुका स्तर/ प्रभाग स्तर | ५१ | रु.१००० | २५ | रु.१००० | २५ | रु.१००० |
| जिल्हा पातळी | ७५ | रु.२००० | ५० | रु.१५०० | २५ | रु.१५०० |
| विभागीय पातळी | १०० | रु.२००० | ७५ | रु.१५०० | ५० | रु.१५०० |
| राज्य पातळी | १२५ | रु.२००० | १०० | रु.१५०० | ७५ | रु.१५०० |

## ३. सभासदत्वाबाबत :-

१) सभासद हा नियोजित संस्थेच्या उद्देशाप्रमाणे पात्रता दर्शविणारी कागदपत्रे असणे आवश्यक आहे.

२) जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांचेकडे नोंदणीकृत असणारी व्यक्ती सभासद होऊ शकेल.

३) एका व्यक्तीस एकाच सम उद्देशाच्या सहकारी संस्थेमध्ये सभासद होता येईल. प्रत्येक सभासद संस्थेच्या कार्यक्षेत्रातील असावा. एकच व्यक्ती एका पेक्षा जास्त सम उद्देशाच्या सहकारी संस्थेचे सभासद आढळून आल्यास त्या व्यक्तीचे संस्थेतील सभासदत्त्व आपोआप रद्द होईल.

४) सभासद हे विभक्त कुटूंबातील असावेत. (एकाच कुटूंबातील सभासद नसावे.)

५) सभासद प्रवेश फी रु.१००/- प्रमाणे आकारण्यात यावी.

**४. जागेबाबत :-**

संस्थेच्या कार्यालय जागेसाठी जागेच्या घरमालकाकडून जागा भाड्याने अगर मालकी हक्काने घेण्यासाठी करारनामा असणे आवश्यक आहे.

**५. ना हरकत प्रमाणपत्र :-**

एकाच उद्देशाच्या (समान उत्पादन / रोजगार) दोन संस्था एकाच गावात / तालुक्यात नोंदणी करता येणार नाहीत. तथापि तशी नोंदणी करावयाची झाल्यास त्या कार्यक्षेत्रातील तशाच उद्देशाच्या (समान उत्पादन / रोजगार) संस्थांचे ना हरकत प्रमाणपत्र संस्थेवर बंधनकारक राहील. तसेच संबंधीत संस्थांना निबंधकानी सुनावणी देऊन गुणवत्तेवर निर्णय घेणेत यावे.

**६. कौशल्य अर्हता :-**

बेरोजगार सहकारी संस्था नोंदणीसाठी सभासदामध्ये किमान एक कौशल्य असणे आवश्यक राहील. त्यामुळे नियोजित संस्थेच्या सभासदापैकी किमान ७५% सभासद औद्योगिक प्रशिक्षण संस्था / जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता केंद्र तत्सम इतर तांत्रिक प्रशिक्षण देणा-या संस्थांमधुन पदवी / पदविका /प्रमाणपत्र धारण करणारे असावे. सदर प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत नोंदणीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील. तथापि, संस्थेला २५% सभासद हे ज्यांचेकडे अधिकृत कौशल्य अर्हता नाही तथापि ज्यांनी केवळ अनुभवातुन तांत्रिक कौशल्य प्राप्त केलेले आहे, त्यांचेतून घेता येतील. परत त्यांनी निबंधकाकडे तांत्रिक कौशल्य असल्याचे स्वयंघोषणापत्र देणे आवश्यक राहील.

तथापि ज्या प्रवर्तकाकडे अधिकृत अर्हतेचे प्रमाणपत्र नाही व ज्यांना केवळ अशा बेरोजगारांची संस्था नोंदणी करावयाची असेल त्यांना ७५% तांत्रिक कौशल्य अर्हतेचे निकष लागु राहणार नाही.

७. नियोजित संस्थेच्या नाव आरक्षण व मुख्यप्रवर्तकांचे नावे बँक खाते उघडण्यांचे प्रस्तावास किमान ११ प्रवर्तक असावेत. तसेच नोंदणी प्रस्तावात निकषा प्रमाणे सभासद संख्या अनिवार्य राहिल .

८. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ४ नुसार सहकारी संस्था अर्थक्षम होणे आवश्यक

आहे. संस्था स्वबळावर अर्थक्षम करावी.अर्थक्षम न होणा-या संस्थांची नोंदणी करण्यांत येऊ नये.

९. सहकारी संस्था करित असलेला व्यवसाय संस्था सभासद व त्यांचे कुटुंबातील सदस्य करित नाही याबाबत संस्थेच्या सभासदांचे स्वयंघोषणापत्र घेणेत यावे.

१०.नोंदणी प्रस्तावा सोबत प्रकल्प अहवाल संस्थेने सादर करावा, प्रकल्प अहवालामध्ये एकूण प्रकल्प खर्चाची किमान १० टक्के रक्कम सभासद वर्गणी भागभांडवलाचे स्वरुपात असावी, उर्वरित रक्कम / निधी संस्थेने स्वबळावर उभारावी.

११. बेरोजगार, स्वयंरोजगार, सुशिक्षित बेरोजगार, महिला , बहुउद्देशीय व इतर सहकारी संस्थेने त्यांचे नोंदणी प्रस्तावात सभासदांची नावे, त्यांचे आधारकार्ड क्रमांक, पॅनकार्ड , मतदार क्रमांक, बँकेचे नाव व खाते क्रमांक या माहितीचा समावेश करावा.

१२. बेरोजगार, स्वयंरोजगार, सुशिक्षित बेरोजगार, महिला , बहुउद्देशीय व इतर सहकारी संस्थेने सभासदांचे कामाबद्दलची मजूरी त्यांचे बँक खात्यात धनादेश , इलेक्ट्रॉनिक क्लिअरन्स व्दारे जमा करावी याचा अंर्तभाव संस्थेच्या उपविधी मध्ये असावा.

१३. संबंधित बेरोजगार, स्वयंरोजगार, सुशिक्षित बेरोजगार, महिला , बहुउद्देशीय व इतर सहकारी संस्थांचे सभासद यांनी आपल्या कामाचा अनुभवाचा दाखला जोडण्यात यावा.

१४. विमा व्यवसाय अथवा विमा शब्द प्रयोग संस्थांचे उपविधीमध्ये करु नये.

१५. संस्था नोंदणीवेळी सादर करावयाच्या योजना / प्रकल्प अहवाल आवश्यक राहिल

## जिल्हा / विभागस्तरीय कार्यक्षेत्रवाढ निकष :

ग्राम स्तर / तालुका स्तरावरील बेरोजगार, स्वयंरोजगार , सुशिक्षित बेरोजगार, महिला , बहुउद्देशीय व इतर सहकारी संस्थांनी जिल्हा स्तरीय / विभागस्तरीय कार्यक्षेत्रवाढी बाबत प्रस्ताव प्राप्त झालेस खालीलप्रमाणे कार्यक्षेत्रवाढीचे निकष निश्चित करण्यांत येत आहेत.

१. ग्रामस्तरीय किंवा तालुकास्तरीय संस्थेचे कार्यक्षेत्र जिल्हास्तरीय किंवा विभागस्तरीय कार्यक्षेत्र करावयाचे असल्यास प्रत्येक तालुक्यातून किमान १० किंवा संस्थेच्या प्रकल्प अहवालानुसार विहित केलेले सभासद संख्या विहीत तालुक्यातून जास्तीचे सभासद संख्या प्रत्येक तालुक्यातून समप्रमाणात करण्यांत यावेत.

२. विभागस्तरीय कार्यक्षेत्रवाढीचे प्रस्ताव मंजूर करावयाचे असल्यास विभागातील प्रत्येक जिल्हयातून किमान १० सभासद किंवा प्रकल्प क्षमतेच्या प्रमाणात विहीत केलेली सभासद संख्या यापेक्षा जादाची सभासद संख्या प्रत्येक जिल्हयातून सम प्रमाणात करण्यांत यावेत.

३. तालुका , जिल्हा स्तरावर नोंदणी होऊन किमान ३ वर्षाचा कालावधी झालेला असावा.

४. कार्यक्षेत्र वाढविण्याच्या अगोदर आर्थिक वर्षाशेवटी किमान ५० टक्के भागभांडवल वाढविण्यांत यावे.

५. मागील सलग तीन वर्ष लेखापरीक्षण वर्ग अ असावा.मागील तीन वर्षात संस्था नफ्यात असावी, संस्था संचित नफा असावा.

६. कार्यक्षेत्र वाढविण्यासंबंधात संस्थेची सविस्तर योजना उदा. नविन कामे उपलब्ध असल्याची माहिती. किती नवीन सभासद होणार आहेत, याबाबत संस्थेने सभासद होण्याबाबत स्वयंघोषणापत्र देणे बंधनकारक राहील.

७. सहकार खात्यातील नामतालिकेवरील / सनदी लेखापाल यांनी लेखापरिक्षणाच्या शिफारशीसह पुढील तीन वर्षाचा प्रकल्प अहवाल व संस्था आर्थिक दृष्टया सक्षम असल्याचे सक्षम प्रमाणपत्र सादर करावे.

८. मागील तीन वर्षात संस्थेच्या विरुध्द कलम ७७, ७८, १४६, ८८, ७५(५) अन्वये कायदेशीर कारवाई झाली नसेलेबाबत निबंधकाचा दाखला आवश्यक आहे.

९. कार्यक्षेत्र वाढीबाबतचा प्रस्तावित कार्यक्षेत्रातील सर्व संस्थांचे नाहरकत प्रमाणपत्र सादर करावे . हरकती असलेस सर्व संबंधीत संस्थांना व प्रस्तावित संस्थेला निबंधकांनी सुनावणी देऊन गुणवत्तेवर निर्णय घेणेत यावा. नाहरकत दाखला घेणे आवश्यक राहील.

राज्यस्तरीय कार्यक्षेत्रवाढ **निकष** :

१. राज्यस्तरीय कार्यक्षेत्र करावयाचे असल्यास किमान २ विभागातून किंवा त्यापेक्षा जास्त विभागातील भौगोलिक सलगतेनुसार प्रत्येक जिल्हयातून किमान १० किंवा प्रकल्प अहवालानुसार विहीत केलेली सभासद संख्या यापेक्षा जी जास्त असेल एवढी सभासद संख्या प्रत्येक जिल्हयातून समप्रमाणात करण्यांत यावी .

२. संस्थेचे वसुल भागभांडवल किमान ५ लाख असावे किंवा संस्था स्वबळावर चालविणे इतपत पुरसे असावे या पैकी जे जास्तीचे असेल ते ग्राहय धरावे.

३. राज्यस्तरीय कार्यक्षेत्र वाढीबाबत सनदी लेखापाल यांचे संस्था आर्थिक दृष्टया सक्षम असल्याचे प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहील.

४. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था यांनी कार्यक्षेत्रवाढी बाबत शिफारशीसह प्रस्ताव सादर करणे आवश्यक राहील.

५. राज्यस्तरीय कार्यक्षेत्रवाढ करणेबाबत मागील सलग तीन वर्ष लेखापरीक्षण वर्ग अ असणे आवश्यक आहे. मागील तीन वर्ष संस्था नफ्यात असावी.

६. संस्थेच्या सर्व सभासदांचा विमा उतरविण्यात आलेला असावा.

७. संबंधित संस्थेच्या संचालकांचे / कर्मचा-यांचे १००% सहकार प्रशिक्षण झालेले असावे.

८. संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच मुख्य कार्यकारी अधिका-यांच्या संयुक्त स्वाक्षरीचे कार्यक्षेत्र वाढीचे निकषांची पुर्तता करीत असलेबाबत प्रतिज्ञापत्र घेण्यात यावे.

९. संस्थेचे संचालक मंडळ योग्य रितीने निवडून आलेले असावे.

१०. संस्थेच्या निबंधकांनी संस्थे विरुध्द मागील तीन वर्षात कलम ७७, ७८, १४६, ८३, ८८, ७५(५) नुसार कायदेशीर कारवाई झाले नसलेबाबतचा दाखला घेणे आवश्यक राहील.

( अनिल कवडे )
सहकार आयुक्त व निबंधक ,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत आवश्यकत्या कार्यवाहीसाठी रवाना

१) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,

२) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,

३) सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,